IMPACT FACTOR:4.197(IIJIF) ISSN: 2454-5503

# CHRONICLE
## OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES

VOL. 6 SPECIAL ISSUE 4 AUGUST 2020

A Bimonthly Peer Reviewed International Journal



## अण्णा भाऊ साठे
## जन्मशताब्दी विशेषांक

*मुख्य संपादक*
**डॉ. कल्याण गांगर्डे**

अतिथि संपादक :
**डॉ. राजू बडुरे | डॉ. आशा गिरी**

*Mahatma Gandhi Education and Welfare Society's*
**CENTRE FOR HUMANITIES AND CULTURAL STUDIES, KALYAN (W)**
*www.mgsociety.in +91 8329000732 Email: chcskalyan@gmail.com*

Scanned with CamScanner

## अनुक्रमणिका

१. मराठी साहित्यातील शिरोमणी : अण्णा भाऊ साठे | डॉ. संतोष हंकारे |०७
२. अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील तत्त्वज्ञान | डॉ. विठ्ठल भंडारे |१२
३. अण्णा भाऊ साठेंच्या साहित्यामधील साम्यवादी विचारप्रर्वतन | डॉ विठ्ठल जंबाले |२१
४. आंबेडकरवादी साहित्यिक अण्णाभाऊ साठे | डॉ. कीर्तीकुमार मोरे |२७
५. अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील आंबेडकरी विचाराचा प्रभाव | डॉ.कहाळेकर सी.एम./ डॉ.अडकीने एस.बी. |३३
६. साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांच्या वाङ्मयातील आंबेडकरवाद | प्रकाश उ. हनवते |४२
७. अण्णा भाऊ साठेंचे मराठी साहित्यातील योगदान |डॉ. बडुरे राजू सा.|४७
८. अण्णा भाऊ साठेंचा वाङ्मयीन दृष्टिकोन | भोपे प्रल्हाद द. |५४
९. अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील आशय विविधता | डॉ. ज्ञानेश्वर खिल्लारी |५८
१०. अण्णा भाऊ साठे : मराठी साहित्यातील अव्दितीय साहित्यिक | डॉ. रवींद्र वै. बेम्बरे |६१
११. अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील मुल्यदर्शन| डॉ.मनोहर सिरसाट |६७
१२. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे : एक संघर्षशील व्यक्तिमत्व | संतोष बा. गालफाडे |७१
१३. अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील समाजवास्तव आणि सामाजिक मूल्यांचा समाजशास्त्रीय अभ्यास | डॉ. एस. के. राठोड |७५
१४. अण्णाभाऊ साठे आणि सामाजिक परिवर्तन एक समाजशास्त्रीय अभ्यास | डॉ. विश्वनाथ मा.सुर्यवंशी |८२
१५. अण्णाभाऊ साठे यांचे सामाजिक, आर्थिक व राजकीय विचार | डॉ.आर.के. काळे |८८
१६. साहित्य शिरोमणी अण्णा भाऊ साठेंच्या वाङ्मयातील सामाजिक परिवर्तनवादी विचार | सिध्दार्थ कुं. इंगोले |९५
१७. अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याची लेखनशैली | संतोष र.कांबळे |१००
१८. अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील ग्रामीण जीवन | डॉ.एम.एफ.राऊतराहे |१०४



Scanned with CamScanner

१५.

# अण्णाभाऊ साठे यांचे सामाजिक, आर्थिक व राजकीय विचार

**प्रा. डॉ.आर.के. काळे**
सहा.प्रा.तथा विभाग प्रमुख
राज्यशास्त्र विभाग
बलभीम महाविद्यालय, बीड.

**प्रस्तावना :**

माणूस हा समाजशील प्राणी आहे. तो ज्या समाजात जगतो, वाढतो त्या समाजाचे त्याला काही देणे लागते ही भावना प्रतयेक व्यक्तीमध्ये जागृत झाली पाहीजे. समाजाची प्रगती करायची असेल तर समाजातील प्रत्येक व्यक्तीने नीतीमत्ता ही पाळणे गरजेचे असते. तेव्हाच समाजाचा विकास होत असतो. समाजात सामाजिक समता, स्वातंत्र्य आणि सामाजिक न्याय पाळणाऱ्यांची संख्या जितकी जास्त असेल तितकी त्या समाजाची प्रगती अधिक होत राहते? समाजनिष्ठा, समाजशिस्त, सामाजिक न्याय, इतर व्यक्तींबद्दल आदरभाव, सामाजिक बांधिलकी हे महत्वपूर्ण घटक आहेत. समाजातील प्रत्येक मनुष्याने गरीब–श्रीमंत, स्पृश्य–अपृश्य, लिंग, धर्म, जात, पंथ यांच्या आधारावर कोणत्याही व्यक्तीमध्ये भेदभाव, पक्षपात करू नये. अशा प्रकारची भावना प्रत्येक मनुष्याने जीवन जगत असताना आचरणात आणणे गरजेचे आहे. तरच समाजाचा सर्वांगीण विकासहोत असतो. समाजाचा विकास होण्यासाठी समाजातील प्रत्येक व्यक्तीने या सामाजिक भानेचा अंगिकार करणे गरजेचे असल्याचे मत अण्णा भाऊ साठे यांनी व्यक्त केले आहे.

माणसाचे जगणे हा त्यांच्या चिंतनाचा विषय आला आहे. यामुळेच माणूस हा त्यांच्या साहित्याचा केंद्रबिंदू बनत गेला. माणसाकडून माणसाचे होणारे शोषण थांबविल्याशिवाय आर्थिक, सामाजिक समता प्रस्थापित होऊ शकत नाही याची जाणीव अण्णाभाऊ साठे यांना होती. म्हणूनच त्यांनी विषमतेवर घाव घातला. मार्क्सवाद हा त्यांच्या अत्यंत जवळचा विषय त्यांनी बनविला. भारतातील आर्थिक विषमता सामाजिक विषमतेवर आधारित असल्याने तयांनी आंबेडकरवादही प्रेरक प्रकारचा मानला होता.

**सामाजिक विचार :**

अण्णाभाऊ म्हणतात, जो परिस्थितीने नडलेला, गांजलेला असतो त्याला दलित म्हणावे लागते. मग तो कोणत्याही जाती, धर्म, पंथाचा असो. त्याची यादलदलीतून सुटका व्हावी हीच कलावंताची अपेक्षा असली पाहिजे.



Scanned with CamScanner

दलित जीरवनाचं वास्तव नित्रण प्रमाणिक हेतूने आणि निष्ठेने अनेक कथा कादंबऱ्यांतून अण्णाभाऊंनी केलेले आहे. दलित म्हणत असतांना एका विशिष्ट जाती जमातीविषयीची अस्मिता त्यांनी प्रकट केली नाही. जे जे अन्यायाखाली भरडले जातात, दारिद्र्याने, दैन्याने, दुरवस्थेने हैराण होतात, परिस्थितीने पिचले जातात ते ते सर्व अण्णाभाऊंना आपलेच वाटतात. त्यांच्या कथा कादंबरीच्या विश्वात फकीरा मांग आहे, तसाच सतू भोसले आहे. व्यंकू माकडवाला आहे, तसेच बरबाद्या कंजारी आहे, विष्णूपंत कुलकर्णी आहे तसाच नाथा पाटील आहे. वैजयंता, राधा, व्यंकूची दुर्गा, मेरी, दरोडेखोर, गुन्हेगार, झोपडपट्टीतील, खिसेकापू, जात, धम्र, पंथ या उपाधींना न जुमानणारी सगळ्यांची जात एकच आहे.

त्यांची सर्वोत्कृष्ट कादंबरी म्हणजे फकीरा होय. या कादंबरीत अण्णांचा प्रतिभेचा सर्वोच्च आविष्कार तेजस्वीपणे प्रकट केला. चित्रा ही कादंबरी मुंबईसारख्या औद्योगिक व वाढत्या लोकसंख्येच्या अफाट नगरात, वाढत्या वेश्याव्यवसायावर व यातील ताणतणावावर, संघर्षावर उभी आहे. चित्रासारख्या परिस्थितीशी झुंजत परंतु बळकट आशावाद आणि त्यासाठी करावी लागलेली झुंज याचे चित्रण या कादंबरीत आहे.

माकडीचा माळ ही त्यांची १९६३ मध्ये प्रकाशित झालेली कादंबरी आहे. सुगीच्या दिवसात गावाच्याबाहेर पाळे ठोकून निर्वाह करणाऱ्या फिरत्या जमातीच्या तांडयाचे मराठी भाषेत पहिल्यांदाच चित्रण झालेले जीवनदर्शन स्पष्ट केले आहे. यामध्ये डबरी, फासेपारधी, डोंबारी, सापगारुडी, शिकलगार, नंदीवाले व दरवेशी इत्यादी फिरत्या जमातीचे पहिल्यांदाच चित्रण घडलेले आहे.

आपल्या कथांतून माणुसकीचा महामंत्र दिला तो अत्यंत महत्वाचा आहे. मी माझ्याा माणसांचे दु:ख जगाला सांगेन. मी अन्यायाविरुद्ध छातीचा कोट करून उभा राहीन. मी मोडेनपणे वाकणार नाही. मी जळेन तरीही उरेन हा महामंत्र त्यांच्या एका साहितयाचे नव्हे तर एकूण त्यांच्या वाङ्मयाचे सामर्थ्य दुणावणारा आहे.

अण्णाभाऊंच्या लावण्यांतून त्यांच्या सामाजिक व्यथेचा चांगलाच बोध होतो. मुंबईची लावणी ही या सर्वांचीच प्रतिनिधी शोभावी इतक्या तोलामोलाची आहे. रंजले गांजलेले सर्वच दलित ही या मागील ठाम भावना. यामुळेच विशिष्ट जात जमात असे संकुचित स्वरूप धारण झााले नाही. जीवनातले सौंदर्य, संगती व सुगंध चांगल्या प्रकारे समजले होते. आणि त्याच्याच प्रस्थापनेचा त्यांना ध्यास लागला होता. म्हणूनच समाजविघातक अशा असत प्रवृत्तीचे ओंगळ दर्शन तयांनी घडविले. सामाजिक सुसंगती साधने आवश्यक वाटले म्हणूनच त्यांनी विसंगतीवर



Scanned with CamScanner

बोट ठेवले आणि सारे जीवन सुगंधित व्हावे, मंगल व्हावे म्हणून नेमकी अमंगलता कोणती, दुर्गंधी कोणती याचे दर्शन कथा कादंबऱ्यातून घडविले.

जो कलावंत जनतेची कदर करतो त्याचीच कदर जनता करते माझ्यादेशावर जनतेवर आणि तिच्या संघर्षावर अढळ विश्वास आहे. देश सुखी व्हावा, समृद्ध व्हावा, इथे समानता नांदावी, महाराष्ट्रभूमीचे नंदनवन व्हावे अशी मला रोज स्वप्ने पडतात आणि ती मंगल स्वप्ने पहात मी लिहित असावे आणि या ठाम भूमिकेवरून अण्णाभाऊंनी सामाजिक लखेन केले.

**आर्थिक विचार :**

विसाव्या शतकामध्ये जगातील राजकीय, सामाजिक आणि तात्विक चर्चेवर ठसा उमटवणारा विचारवंत कार्ल मार्क्स आहे. तीन खंडात असलेला दास कॅपिटल हा ग्रंथ लिहून मार्क्सने भांडवलशाही व्यवस्थेत क्रांती कशी घडवून आणली जाईन या बद्दल मत मांडले की समाजातील एक विशिष्ट वर्ग सदैव निसर्गाशी संघर्ष करण्यात गुंतलेला असतो. या वर्गाने कष्ट करुन निर्माण केलेल्या संपत्तीचा उपभोग मात्र इतर वर्ग घेत असतो. समाजात आर्थिक विषमता कशी निर्माण होते आणि ती कशी नष्ट करता येइल याचा विचार करीत असतांना मार्क्सने ऐतिहासिक भौतिकवाद पाया आणि इमारत, क्रांती विचार प्रणाली आणि राजसंस्थेचे स्वरुप अशा प्रकारचे सिद्धांत मांडले. मुंबईतील कामगार चळवळीत काम करताना त्यांना मार्क्सवाद हा समाजपरिवर्तनाचा मार्ग वाटला. आर्थिक विषमता किंवा समाजातील दारिद्र्य दूर करण्याचा आणि सर्वांना जगण्याचा समान हक्क प्राप्त करुन देणारा मार्ग म्हणून अणाभाऊ साठे मार्क्सवादाकडे पाहतात.

सामाजिक विषमतेमधून निर्माण झालेली गरीबी ही मागास वर्गाची मुख्य समस्या आहे. विज्ञान युगातही माणसांच्या प्रवृत्तीत बदल झाला नाही. उलट पाशवी प्रवृत्ती कशी अधिकाधिक बळावत चालली आहे आणि या सर्वांना आर्थिक विषमता जागजागी कशा प्रकारे कारण ठरत आहे हेच दाखविण्यात आले आहे. माणूस पैशाच्या मापात मोजून दुसऱ्याच्या जीवनाचा घास घ्यायला केवळ आर्थिक सामर्थ्याने कसा सज्ज होत आहे तसेच बहुजन सुखय बहुजन हिताय असे काही तरी सांगायचा ध्यास लागला असल्यानेच कलावंत समाजाची नेमकी गरज ओळखतो व अचूक त्या दृष्टीने अशा माध्यमांचा वापर करतो.

**राजकीय विचार :**

अण्णाभाऊंच्या तमाशातील आशय जनतेच्या जिव्हाळ्याचा, जनतेला रुचणारा असाच आहे. मग तो सार्वजनिक निवडणूकीसंबंधी असो, कामगाराच्या बेकारी संबंधी असो, शेतकऱ्यांच्या एखाद्या ज्वलंत प्रश्नांसंबंधी असो वा संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यासंबंधी असो, मोजकी पात्रे, साधेसुधे कथानक, सांप्रदायिक

पण आकर्षक मांडणी, प्रसादपूर्ण कवने निर्माण केली. जनता राजकीयदृष्ट्या स्वतंत्र झाली तरी तिचे आर्थिक व सामाजिक जीवन सुखी होतेच असे नाही. परवशतेच्या दु:खाबरोबर अज्ञान व दारिद्र्य ही दु:खेही नाहीशी झाली पाहिजेत असे जनतागीताचे आग्रहाचे सांगणे आहे.

समान हक्क व कर्तव्य, स्त्री–पुरुष समानता, राजकीय जबाबदारीची जाणीव, भ्रष्टाचार निर्मूलन, मतदान करणे, लोकशाही मूल्यांची जपवणूक, व्यक्तीचा पर्यायाने समाजाचा, देशाचा विकास होऊ शकतो.

शेटजीचे इलेक्शन या लाकनाट्यात राजकीय जाणीव, सामाजिक जाणीव, राजकीय क्षेत्रातील माहिती याचे विश्लेषण केले. राजकारणात बायकांनी पडू नये, त्यांांना राजकारणातील काहीही समजत नाही असे म्हणणाऱ्या मगरचंदाला तारा म्हणते की शेतकऱ्याचे कोणते प्रश्न आहेत, गावात कोणत्या प्रकारच्या अडचणी आहेत हे सर्व कॉंग्रेसच्या जाहीरनाम्यात नाहीत तर ते कम्युनिस्ट पक्षाच्या जाहिरनाम्यात आहेत हे मगरचंदला पटवून देते.

अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यात राजकीय जीवनमूल्यांचा अंगिकार केला आहे तसेच व्यवहारात त्याचा उपयोग कसा होईल, कोणता उमेदवार चांगला वाईट आहे, कोणता उमेदवार समाजाचा विकास करु शकतो याचा सारासार विचार करुन चांगल्या व नीतीमान उमेदवाराला समाजात निवडून देतात. स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय या लोकशाही मूल्यांचा स्वीकार समाजात केला जाणे गरजेचे आहे ते स्पष्ट करतात.

**समता, स्वातंत्र्य आणि बंधुता : —**

आपण जे जीवन जगतो तेच जीवन जगणाऱ्या बहुजन जनतेच्या मनातील उदात्त स्वप्ने, विचार शब्दबद्ध करावेत यामोहाने ग्रंथाना पुढे आणावे यासाठी प्रयत्न करावेत. अण्णांना दलित जीवनात पिचणाऱ्या माणसांचाच विचार बैचेन करु लागला होता. पोवाड्याला चिंतनची ठाम अशा स्वरुपाची विशेष बैठक होती. त्यांच्या ज्वलंतआणि जातीवंत प्रतिभेत सहज डोळ्यात भरावा असा मर्दानीपणा होता. आणि त्या मर्दानीपणाला अण्णाभाऊंनी कारुण्याची सुंदरशी रम्य किनार जोडली होती. गुलामगिरीबद्दल वाटणारा द्वेष त्यांनी पोवाड्यातून खंबीरपणे प्रकट केला. आपल्या अंतरंगात सामाजिक अन्यायाविरूद्ध विषमतेविरुद्ध, विसंगतीबद्दल निर्माण झालेली आग ते ज्वालाग्रहाही शब्दाने व्यक्त करत गेले.

धगधगणारे जीवन जगणाऱ्या माणसांचे विश्वच रेखाटण्यात अण्णाभाऊंनी धन्यता का मानावी? तर याचे उत्तर एकच देता येईल की अण्णाभाऊंच्या मनाचा व त्या जीवनाची जातकुळीच मुळी एक होती. उपेक्षितांचे



Scanned with CamScanner

अंतरंग उलगडून दाखविण्याचा प्रयत्न वेगळ्या वळणाचा होता. सगाजी, रामभोसे, राही, सत्या रामवंशी, शेवंती, देवकाई इत्यादी पददलित म्हणून किंवा उपेक्षित म्हणून मानल्या गेलेल्या माणसांची कैफियत अत्यंत पोडतिडकीने मांडली. ती मात्यांनी यापुढे जाऊन त्यांची वास्तव चित्र रेखाटले. माणूसच माणसाचा घ्यायला या विषमतेतून ग्रासलेला समाजात कसा सिद्ध झाला आहे हेच दाखवून दिले आहे.

दलितांच्या जीवनाचं वास्तव चित्रण प्रामाणिक हेतूने आणि अनेक कथा कादंबऱ्यातून अण्णाभाऊंनी केलं आहे. दलित म्हणत असतांनाएका विशिष्ट जाती जमातीविषयीची अस्मिता त्यांनी प्रकट केली नाही. जेजे अन्यायाखाली भरडले जातात, दारिद्रियाने, दैन्याने, दूरवस्थेने हैराण होतात. परिस्थितीने पिचले जातात. उपेक्षेचे, अपमानाचे अगतिक जीवन जगत असताता. ते सर्व अण्णाभाऊंना आपले वाटतात.

अस्पश्यांच्या जीवनात मरणप्राय यातना होत्या. जनमाने आम्ही अस्पृश्य नाही तर हे अस्पृश्यांचे भयानक भूत येथेच हेतू पुरस्पर निर्माण केले गेले, त्यावर आघात करुन ते उद्धवस्त करण्याचा निर्धार अण्णांनी केला म्हणून अण्णांना महात्मा फुले, शाहू, गाडगेबाबा, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे वारसदा म्हटले तर वावगे ठरणार नाही. कारण अण्णांचेमूळ ध्येय मानवमुक्ती हे होते.

समाजात उघड्या डोळ्यांनी वावरले व समाजाची योगय नाडी तपासून अशक्त रोगीट समाजाला योगय दिशा उपचार करण्यासाठी संपूर्ण हयात घालविली. समाजातील विषमता, सावकारशाही, काळाबाजार, दारिद्रय व अज्ञान या सर्व विषारी विळख्यात अडकलेला हरीजन बहुजन समाज की ज्यांच्या नशिबी आलेले दु:ख, यातना, अपमान, गुलामगिरी या साऱ्यांवर इलाज केला.

समाजात उघड्या डोळ्यांनी वावरले व समाजाची योग्य नाडी तपासून अशक्त रोगीट समाजाला योगय दिशा उपचार करण्यासाठी संपूर्ण हयात घालविली. समाजातील विषमता, सावकारशाही, काळाबाजर, दारिद्रय व अज्ञान या सर्व विषारी विळख्यात अडकलेला हरीजन बहुजन समाज की ज्यांच्या नशिबी आलेले दु:ख, यातना, अपमान, गुलामगिरी या साऱ्यांवर इलाज केला.

शहिरी या कलेतून सारा महाराष्ट्र जागविला. ज्यांना अस्पृश्य म्हणून गुराढोरांचे जीवन जगावे लागले, त्याच घरी जन्माला आलेल्या शरिराने संयुक्त महाराष्ट्राची चळवळ यशस्वी करुन दिली. प्राचीन काळी देवालयातून वेदांचे पठण केले जात होते ते पठण जर चुकून एखाद्या अस्पृश्याने ऐकले तर त्याच्या कानात गरम तेल टाकले असे. कुणी म्हटले तर त्याची जीभ कापली जात होती. या असंख्य विषमतावादी परंपरांवर पिळवणूकीवर अण्णांनी प्रहार केला.



Scanned with CamScanner

कोणतीच कला, मानव हा हीन जातीचा, कमी नाही. सर्व माणसे सारखी आहेत. समता प्रस्थापित करण्यासाठी अण्णांनी अतोनात प्रयत्न केले.

दारिद्रयासोबत रडत बसणे अण्णांना आवडत नव्हते तर बाबासाहेबांनी सांगितलेली त्रिसूत्री शिका–संघटीत व्हा आणि संघर्ष करा, त्याशिवाय दारिद्र्यातून बाहेर निघणे अवघड आहे. जोपर्यंत आपण अज्ञानापासून अंधश्रद्धेपासून, गुलामगिरीतून बाहेर पडत नाही तो पर्यंत आपली प्रगती नाही. जीवनामध्ये नवी पहाट, प्रकाशदीप लावण्यासाठी शिक्षणच घेतले पाहिजे. अण्णा स्वत: खूप वर्ग शिकले नव्हते, त्याची त्यांना नेहमी खंत वाटत होती. पण इतर आपल्या बांधवांनी व भगिनीनी खुप शिकावे ही तळमळ त्यांच्या मनात होती.

**निष्कर्ष :**

थोडक्यात अण्णाभाऊ साठे हे असे बहुरंगी व्यक्तिमत्व आहे. कामगार, कवी, लोकशाहीर, कथाकार, कादंबरीकार, नाटककार, चळवळीत काम करणारा कार्यकर्ता, लोकनाट्याचे जनक, उत्तम नट आणि माणसावर, मावी जीवनावर उत्कट प्रेम करणारा माणूस असे विविध पैलू असलेले हे व्यक्तिमत्व आहे. अण्णाभाऊंनी त्या काळात विषमतेच्या विळख्यात गुंतलेल्या, उद्धस्त झालेल्या लोकांना हक्काची जाणीव करून दिली परंतु आज कोणतेही क्षेत्र भ्रष्टाचारपासून मुक्त नाही. बोटावरमोता येतील एवढेच काही राजकीय पुढारी, समाजसेवक व प्रशासकीय अधिकारी प्रमाणिक, लायक आहेत. सामान्य नागरिक उघड्या डोळ्यांनी पाहतो आहे. लोकशाहीत आपलयाच माणसाकडून आपली फसवणूक पिळवणूक होत आहे. सत्तेसाठी घाणेरडे राजकारण सुरु आहे. खरे बोलणारा, लिहिणारा इथल्या नजरेत गुन्हागार ठरतो आहे. चार भिंतीच्या आत लेखन करणारे साहित्यिक पुरस्कार घेवून ऐशआरामात व चैनीत जीवन जगत आहेत. समाजात जावून वास्तव चित्रण करणारे साहित्यिक आज कमी झाले आहेत. अण्णाभाऊ साठेंची जीवन दृष्टी विशाल, चिंतनशील होती. मानवी मूल्यांची होणारी हेळसांड, अपमान दूर करण्यासाठी स्वातंत्र्य, समता, न्याय व बंधुता ही मानवी मूल्ये समाजात रुजवण्याचा प्रयत्न केला. समाजात नवचैतन्याची, समतेची, सुखाची, प्रगतीची व मानव मुक्तीची पहाट निर्माण केली. मनुष्याच्या उन्नतीसाठी, दैनंदिन व्यवहार सुरळीत चालण्यासाठी, समाजात चांगले वातावरण निर्माण करण्यासाठी आपल्या संस्कृतीचा गौरव करण्यासाठी, स्वातंत्र्य, समता व बंधुता चा जास्तीत जास्त लोकांनी स्वीकार केला. तितक्या प्रमाणात त्या व्यक्तीचा समाजाचा, देशाचा विकास होऊ शकतो. संयम, प्रमाणिकपणा, सत्य, अहिंसा, दया, क्षमा, शांती, श्रमप्रतिष्ठा, नम्रता, उदारता, सत्य, स्नेह, स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय इत्यादी जीवनमूल्ये रुजवून समाजात परिवर्तन करण्याचे कार्य



Scanned with CamScanner

अण्णा भाऊंनी केले. समाजातील आर्थिक आणि सामाजिक विषमता हा त्यांच्या चिंतनाचा विषय बनला. या चिंतनाचा कलात्मक आविष्कार म्हणजेच त्यांचे सामाजिक, आर्थिक आणि राजकीय विचार होत.

**संदर्भ ग्रंथ :–**


१) पिंगळे वि.दा. – लोकशाहीर अण्णा भाऊ साठे : भक्ती–सुगंध प्रकाशन, पुणे २०१२.

२) पोतदार जाधव – शाहीर अमर–अण्णा अनुबंध प्रकाशन, पुणे २००४.

३) गुरव बाबुराव – अण्णाभाऊ साठे, लोकवाङ्मय गृह, मुंबई २००२.

४) गुरव बाबुराव – अण्णाभाऊ साठे समाविचार आणि साहित्य विवेचन, लोकवाङ्मयगृह मुंबई १९९९.

५) संपादक डांगळे अर्जून, उपाध्ये नीला, नाईक वसुंधरा, सावरकर सुभाष – लोकशाहीर अण्णाभाऊ साठे निवडक वाङ्मय महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई प्रथमावृत्ती १ ऑगस्ट १९९८.

६) साठे दिनकर सहदेव अण्णा भाऊंच्या आठवणी, संकेत प्रकाशन नागपूर, २००७.

७) डॉ. माधव रा. पोतदार – शाहीर अमर–अण्णा, अनुबंध प्रकाशन पुणे, २००४.

८) सकाटे मच्छिंद्र – अण्णाभाऊ साठे, छाया प्रकाशन पुणे, १९८६.


❑❑❑



Scanned with CamScanner